रयत शिक्षण संस्थेचे,

# विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय,माहुली . ता . खानापूर जि . सांगली

## स्थापना व पार्श्वभूमी

शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी गावोगावी पसरविण्याचे उदात्त ध्येय बाळगणारे कर्मवीर भाऊराव पाटील (रयत शिक्षण संस्थेचे, संस्थापक)यांनी सातारा सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे उपाध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्षपदी असणारे कै . विठ्ठलराव देशमुख यांची शिक्षणाबद्दलची तळमळ व आस्था दातृत्व पाहून माहुली येथे रयत शिक्षण संस्थेची शाखा सन १९६२ साली त्यांच्याच (माहुलकरदादा) नावाने सुरू झाली . ती म्हणजे विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय, माहुली .

## इमारत

माहुली येथील कर्मवीर शैक्षणिक संकुलात संस्थेच्या जागेवर दुमजली भव्य इमारत बांधली आहे . एकूण ३ वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कार्यालय, सभागृह, ग्रंथालय, संगणक कक्ष, अध्यापक कक्ष तसेच दुमजली इमारतीवर ९ खोल्या अशा एकूण २२ खोल्या आहेत . २०० चौ . मी (२१०० स्क्वेअर फुट)नूतन सभागृह बांधकाम पूर्णत्वास आले आहे . सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असणाया अध्यापक विद्यालयास भव्य क्रींडागण आहे .

## सेवक माहिती

ज्ञानगंगा विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी अध्यापक विद्यालयात प्रशिक्षित व्यासंगी व अनुभवी प्राध्यापक कार्य करीत आहेत . एक प्राचार्य, **३** प्राध्यापक, १ लेखनिक,१ शिपाई असे एकूण **६** सेवकवर्ग असून ते निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्यरत आहेत .

## सेवांतर्गत प्रशिक्षणार्थी

सर्व शिक्षण अभियान मोहिमे अंतर्गत आमच्या अध्यापक विद्यालयात नवनियुक्त प्रशिक्षित शिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण केंद्र चालविले जात आहे त्यासाठी खानापूर, विटा, आटपाडी, कडेगाव,तासगाव येथील प्रशिक्षणार्थ्यांना या मोहिमेअंतर्गत प्रशिक्षण दिले जाते .

## सराव पाठशाळा

सेवापूर्व प्रशिक्षणाचा आत्मा म्हणजे सराव पाठ घेण्यासाठी जि . प . प्राथमिक केंद्रशाळा नागेवाडी, माहुली, गार्डी घानवड व महात्मा गांधी विद्यालय . माहुली . जि . प . प्राथमिक शाळा मुले व मुली मायणी . जि . प . केंद्रशाळा धोंडेवाडी येथे प्रथम व दवितीय वर्षाचे सराव पाठ घेतले जातात .

## प्रयोगशाळा

विज्ञान विषयाच्या अध्यापनाचा मार्ग प्रयोगशाळेतून जातो . ज्ञानाला कृतीची जोड देण्यासाठी आमच्या अध्यापक विद्यालयात स्वतंत्र व सुसज्ज अशी प्रयोगशाळा आहे . ही प्रयोगशाळा विज्ञान साहित्याने सुसज्ज असून

नियोजनानुसार या साहित्याचा वापर करून घेतला जातो. दर वर्षी शास्त्रीय साहित्य खरेदी केले जाते. या विभागाचे प्रमुख म्हणून श्री. वाजे बी. एन. काम पहात आहे.

## ग्रंथालय

ग्रंथ हेच गुरू या म्हणीप्रमाणे अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी तसेच वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी स्वतंत्र ग्रंथालय खोली असून ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, कथा, कादंब-या, डी. टी. एड. ची पाठयपुस्तके तसेच मौलिक ग्रंथ व नव्या अभ्यासक्रमानुसार इ. १ ली ते ८ वी अभ्यासक्रमाची कमिक पुस्तके, सी. ई. टी. टी. ई. टी. स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणारी मार्गदर्शन पुस्तकेही ग्रंथालयामध्ये आहेत. या सर्व संदर्भ ग्रंथाचा लाभ अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक व प्राध्यापक वर्ग घेतात.

ग्रंथालय समृद्ध करण्यासाठी प्रथम व दवितीय वर्षातील छात्राध्यापक त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देत आहे. या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा. श्रीम. लांघी व्ही. टी. काम पहात आहे.

## शेती विभाग

आमच्या अध्यापक विद्यालयास ७२ एकर शेती असून ५२ एकर जमीन सामाजिक वनीकरण व २० एकर जमिनीत फलोदयान प्रकल्प राबविला जातो. २० एकर फलोदयान प्रकल्प अंतर्गत आंबा, चिंच, सीताफळ इ. फळांची झाडे आहेत. त्यांचे चांगल्या पद्धतीने संगोपन केले जात आहे. जमीन सपाटीकरण केले आहे. तसेच चितळीच्या शेतीत दीड एकर जमीन असून या शेतीमध्ये हंगामी खरीप व रब्बी पिके घेतली जातात. चितळी शेतीत मागील खरीप हंगामामध्ये बाजरी व रब्बी हंगामामध्ये हरभरा पिकाचे उत्पन्न घेण्यात आले. या शेतीचे कामकाज प्रा. श्री डॉ. नवले डी. आर. विभागप्रमुख म्हणून पार पाडत आहे.

## चित्रकला परीक्षा

आमच्या अध्यापक विद्यालयामध्ये चित्रकला परीक्षा केंद्र असल्याने परीक्षेसाठी जवळपासच्या शाखेतील मुली येतात. इंटरमिजिएट व एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेसाठी एकूण ५१ विद्यार्थी बसले होते. इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १०० % व एलिमेंटरी निकाल १०० % लागला आहे.

## कीडा व बौदधिक स्पर्धा

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांगली जिल्हा आंतर अध्यापक समन्वय समिती व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कीडा व बौदधिक स्पर्धांमध्ये सहभाग घेत आहे.

## सांस्कृतिक कार्यकम

विद्यार्थ्यांच्या अंगी असणाया विविध कलागुणांना वाव देण्यासाठी आमच्या अध्यापक विद्यालयात सांस्कृतिक विभागांतर्गत विविध कार्यकम आयोजित केले जातात. त्यामध्ये थोर व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी, राष्ट्रीय सण, गुरूपौर्णिमा, शिक्षक दिन, कर्मवीर जयंती, इ. कार्यकमांचा समावेश असतो.

## दत्तक पालक योजना

गरीब, गरजू,होतकरू छात्राध्यापकांना या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाते. या योजनेत प्रथम वर्षातील १ व द्वितीय वर्षातील ३ अशा एकूण ४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## विविध मंडळे

विज्ञान व गणित मंडळ : छात्राध्यापकांची तर्कशक्ती, बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी विज्ञान मंडळ. तसेच भूगोल व वाड.मय मंडळ कार्यरत आहेत.

## अवांतर लेखन

अध्यापकाचार्य ज्ञान अदयावत ठेवण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथाचे वाचन करून. जे जे अनुभव आलेले आहेत. त्याआधारे अंवातर लेखन करून विविध लेख वर्तमानपत्र, मासिक, याच्या माध्यमातून प्रसिद्ध करीत आहे. पुस्तक लेखन करीत आहे.

## समारोप

भावी काळात आदर्श व गुणवान शिक्षक कसे तयार होतील यासाठी प्रशिक्षणार्थ्यांवर उत्तम संस्कार व चांगले मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न आहे. या अध्यापक विद्यालयास भावी काळात प्रगतीपथावर नेण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य श्रीम. भोसले एस. एस व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी सदैव प्रयत्नशील आहेत.

प्राचार्य
विठ्ठलराव देशमुख ज्युनि.कॉलेज ऑफ एज्यु.
माहुली,ता.खानापूर,जि.सांगली